# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/12/2022 (मंगळवार) दुपार

---

**दुखापत**

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत वार्ड न. ०४ खापरखेडा येथे दिनांक ०४/१२/२०२२ चे १२.४५ वा. ते २३.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— रवी अरुण तिवारी, वय ३३ वर्षे, रा. वार्ड नंबर ४ खापरखेडा व आरोपी नामे— सुमित वंजाळ रा. एपी बारच्या मागे खापरखेडा हे बारचे मालक असून दोघांची एकमेकाची बार मधील उधारीच्या पैशाचे कारणावरून घटना वेळी व ठिकाणी यातील कपिल मेश्राम यांच्या घरी लग्नाचे निमित्त मटणाचा कार्यक्रम सुरू असताना आरोपी याने फिर्यादीस बारचे उधारीचे कारणावरून हात बुकक्याने चेहऱ्यावर व नाकावर हातातील कडाने मारून जखमी केले व शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली .

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं ३८१ मेश्राम पो.स्टे. खापरखेडा हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर